# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०५.०७.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक २८.०६.२०२५ चे १८.०० वा. ते २२.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी उत्तम राममुरत तिवारी वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. १६, राजीव नगर, हिंगणा रोड, नागपुर यांनी त्यांची स्प्लेंडर मोटर सायकल क्र. एम.एच. ४० बिवाय २३८२ किंमती ५०,०००/—रू. ची ही लॉक करून, पार्क करून पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत लोकमान्य मेट्रो स्टेशन पार्कींग, नागपूर येथे ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद स्प्लेंडर मोटर सायकल चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून, आरोपी नामे आंनद सुखदेव रहांगडाले वय २५ वर्षे, रा. चिलोद, ता. जि. गोंदीया ह.मु. लोकमान्य नगर, आयसी चौक, मैथ्थी यांचे किरायाने, एमआयडीसी, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे ५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी एमआयडीसी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य. गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**२) सक्करदरा पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०५.०७.२०२६ चे ००.२० वा. चे सुमारास, सक्करदरा पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, भांडेप्लॉट, उगले चे घरासमोरील रोडवर एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुशिल उर्फ कोमा उत्तम वाघमारे वय २१ वर्षे रा. चाटे कोचींग क्लासेस मागे, चांभारे किराणाजवळ, भांडेप्लॉट, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२५ दिनांक २८.०७.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म. पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ४, मा. श्री रोशन पंडीत, सपोआ, सक्करदरा विभाग, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि प्रमोद पोरे, पोउपनि संतोष आंधळे, पोहवा धमेंद्र नितनवरे, ज्ञानेश्वर बांते, दीपक रोहणे, संदीप लोलसरे यांनी केली.

**३) जरीपटका पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर मालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.०७.२०२६ चे २३.५० वा. चे सुमारास, जरीपटका पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, किंगज्वे किचन वरील पहिल्या माळयावर, ओरो कॅफे येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे कॅफे चालक आरोपी क्र. १) सोयल अशोक जांभुळकर वय २५ वर्ष, रा. इंदीरानगर, जरीपटका, नागपूर २) डॅनियल प्रविण मॅस्सी वय २५ वर्ष रा. गड्डीगोदाम, मोहन नगर, सदर, नागपुर हे ०७ ग्राहकांना बिअर तसेच शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपींना विचारपूस केली असता, ते कॅफे मालक नामे जॉन्टी सालोमन फिलीप्स वय २७ वर्ष रा. संत मार्टीनगर, जरीपटका, नागपूर याचेसह संगनमताने विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन बिअर, हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का व ईतर साहित्य असा एकुण ९२,२३०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेमालक, वेटर व ग्राहक असे एकूण १० आरोपींविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका येथे कलम ६८ म.दा.का. सहकलम ४,२१ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम—२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम—२०१८.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) श्रीमती विनिता शाहु, मा. पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६) श्री. संदीप पखाले, मा. सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) श्री. सत्यवीर बंडीवार यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. अनिल ताकसांडे, पोउपनि. अनंता गारमोडे, पोहवा. संदीप, नितीन राणे, आकाश, रविशंकर, प्रविण, पोअं. प्रकाश नफ्ते, आशिष व प्रमोद यांनी केली.

(गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे पाचपावली :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०५.०७.२०२६ चे ०१.१० वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, जनता वाईन शॉपसमोर, कमाल चौक, शनिचरा मार्केट येथे एक इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, एक ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव किशोर बंडू सहारे वय ३३ वर्षे रा. बाळाभाऊपेठ, गणोबा बाडी, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती अंदाजे ५००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे सिताबर्डी :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी श्रीमती लेखा राजकुमार हिंगोरानी वय ६० वर्षे रा. प्लॉट क्र. ५०१, श्रीहरी अपार्टमेंट, गोकुलपेठ, नागपूर यांना रक्कम गुंतवणुक करायची असल्याने, त्यांनी त्यांचे शेजारी यांनी सांगितलेल्या माहितीवरुन, अविशा इंडीया म्युचुअल बेनिफिट निधी लिमीटेड नावाचे कंपनीचा आरोपी १) रोमी रमेश रामटेके रा. खडगाव रोड, गौतमनगर, वाडी टेकडी, लावा, नागपुर व मॅनेजर २) सुष्मिता गौतम रा. वार्ड क्र. ६८, चिंतामण नगर, हजारी पहाड, नागपूर यांचेसोबत संपर्क केला असता, त्यांनी फिर्यादी यांना गुंतवणुकीवर दरमहा व्याज व तीन वर्षानंतर गुंतवणुकीची संपुर्ण रक्कम परत मिळेल अशी स्किम सांगितली. फिर्यादी यांनी दिनांक ०८.०२.२०२३ रोजी आरोपीचे कंपनीत ३० लाख रुपये गुंतविले. आरोपी यांनी फिर्यादी यांना मॅच्युरिटीचे प्रमाणपत्र दिले. फेब्रुवारी २०२४ पर्यंत आरोपींनी फिर्यादीस गुंतवणुक केलेल्या रकमेवर एक टक्का व्याज दरमहा दिले. त्यांनतर आरोपी यांनी टाळाटाळ केली. फिर्यादी यांनी रक्कम परत मागितली असता, आरोपींनी रक्कम परत न करता, शिवीगाळ करुन धमकी दिली. आरोपीनी फिर्यादीस गुंतवणुकीवर व्याजाचे आमिष दाखवून विश्वास संपादन करुन, फिर्यादीस परतावा न देता तसेच रक्कम परत मागीतली असता, आरोपींनी रक्कम परत न करता, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे मसपोनि. डहाके ९९७५४१९६७३ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४), ३(५) भा.न्या.सं. सहकलम ३, एमपीआयडी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे हिंगणा :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, वरोडा गावाजवळ असणाऱ्या अंश इंफ्राटेक यांचे आर्या ट्रस्ट नर्सिंग केअर सेंटरचे साईटवर फिर्यादी अभिजीत अशोक वय ४३ वर्ष रा. महाल, नागपुर हे कंत्राटदार म्हणून काम करतात. दिनांक ०३.०७.२०२६ चे २१.०० वा. फिर्यादी हे काम आटोपून घरी गेले व सकाळी १०.०० वा. परत आले असता, दिनांक ०३.०७.२०२६ चे ०१.०० वा. ते ०२.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे साईटवरील ऑफीसचे बाजुला असलेल्या कंटेनरचे दार तोडुन, त्यामध्ये ठेवलेले वेगवेगळया जाडीचे तांब्याचे ताराचे बंडल एकूण ८० नग, कि. ४,९०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले.

फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे मपोउपनि. गायत्री चव्हाण ९२८४१४९४१८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३४ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३१०००७३/ २००४ | कलम ३२४ भादंवि | विनोद सुर्यभान सनेश्वर रा. चांदमारी नगर,प्रमोद घोडगेचे एस टीडी दुकानाजवळ, नागपुर. | ०७.०७.२०२६ |

स्वा/—
( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.